350

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

४ था मजला,
एक्सप्रेस टॉवर्स,
नरीमन पॉईंट,
मुंबई – ४०० ०२१.

दूरध्वनी : २०२ ६२४१
२०२ ५३५४
२८३ ५२४७
फॅक्स : २०२ १३४८
एसटीडी : ०२२
ग्राम : पाणी मंडळ, मुंबई.

जा.क्र.मजीप्रा/सस/तांशा-१/३५०/ 1396 दिनांक : ६.४.२०००.

**परिपत्रक क्रमांक ३१**

**विषय :** पाणी पुरवठा योजनांचे उद्घाटन वा भूमीपूजन समारंभ..

पाणी पुरवठा योजनांचे भूमीपूजन समारंभ किंवा उद्घाटन समारंभ आयोजित करीत असताना त्याची पूर्व कल्पना स्थानिक लोकप्रतिनिधींना देण्यात यावी व त्यांना निमंत्रित करण्यात यावे अशा सूचना पूर्वीच देण्यात आलेल्या आहेत. तथापि सदर सूचनांचे क्षेत्रीय अधिका-यांकडून पालन होत नसल्याचे मा.मंत्री, ग्राम विकास, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष यांनी माझ्या निदर्शनास आणून दिले आहे.

पाणी पुरवठा योजनांचे उद्घाटन वा भूमीपूजन समारंभ आयोजनाची कल्पना स्थानिक लोकप्रतिनिधींना न देणे तसेच त्यांना सदर कार्यक्रमासाठी निमंत्रित न करणे ही बाब पूर्णतः अनुचित आहे. या अनुषंगाने आपणा सर्वांना पुन्हा निर्देशित करण्यात येत आहे की पाणी पुरवठा योजनांचे उद्घाटन वा भूमीपूजन समारंभ आयोजित केल्यास त्याची पूर्व कल्पना त्या त्या मतदार संघातील खासदार, आमदार व इतर स्थानिक लोकप्रतिनिधींना देण्यात येवून सदर कार्यक्रमाचे त्यांना रितसर आमंत्रणही देण्यात यावे. या प्रकरणी दुर्लक्ष होवू नये याची दक्षता घेण्यात यावी.

(राजेंद्र सगणे)
**सदस्य सचिव ( तांत्रिक )**

मा.मंत्री, ग्राम विकास, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष यांचे माहितीसाठी सादर.
सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे माहितीसाठी.
सदस्य सचिव (प्रशासन) , म.जी.प्रा., मुंबई यांचे माहितीसाठी.
विशेष कार्य अधिकारी व मुख्य अभियंता, म.जी.प्रा., नवी मुंबई यांचे माहितीसाठी.
सर्व मुख्य अभियंता, म.जी.प्रा., यांचे माहितीसाठी.
सर्व अधीक्षक अभियंता, म.जी.प्रा.मंडळ, यांना माहितीसाठी व कार्यवाहीसाठी.
सर्व कार्यकारी अभियंता, म.जी.प्रा.वां.वि.क. यांना माहितीसाठी व कार्यवाहीसाठी.

M. J. P.
ISSUED
7 APR 2000
MUMBAI-21